# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उद्यान / 135 /2024-25 दिनांक :- 11/06/2024

## // जाहीर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहीर करण्यात येते की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | भाईंदर (प.) 60 फिट रोड, येथिल राशी कलेक्शन दुकानासमोर | 01 नग रेन्ट्री | सदरचे मनपा रोडवरील झाड भाईंदर (प.), 60 फ़िट रोड, येथिल राशी कलेक्शन दुकानासमोर धोकादायकरित्या उंच वाढलेले असून सदरच्या झाडाच्या मूळाला उंदिर व घुशीने पोखरलेले असल्याने झाडाची मुळे वर आलेली आहे. सदरचे झाड धोकादायकरित्या रस्त्याच्या बाजुस झुकलेले आहे. जोराच्या वा-याने झाड पडून जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरच्या झाडाची उंची पाहता सदरचे झाड काढून पूर्नरोपण करणे शक्य नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. |
| 2 | भाईंदर (प.) नवघर हॉस्पीटलच्या समोरिल बाजुस, संतोज टॉकीज जवळ | 01 नग बदाम | सदरचे मनपा रोडवरील झाड भाईंदर (प.), नवघर हॉस्पीटलच्या समोरिल बाजुस, संतोज टॉकीज जवळ धोकादायकरित्या उंच वाढलेले असून सदरच्या झाडाचा कठडा तुटलेला असल्याने झाडाची मुळे वर आलेली आहे. सदरचे झाड धोकादायकरित्या समोरिल बिल्डींगच्या एका बाजुस झुकलेले आहे. जोराच्या वा-याने झाड पडून जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरच्या झाडाची उंची पाहता सदरचे झाड काढून पूर्नरोपण करणे शक्य नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. |
| 3 | भाईंदर (प.) प्लॉट नं.21, मधुअगरवाल नर्सीग होम जवळ, महाराणी लक्ष्मीबाई गार्डनच्या समोर येथिल श्री. विकास कळमकर यांच्या घराच्या आवारातील | 03 नग नारळ | भाईंदर (प.) प्लॉट नं.21, मधुअगरवाल नर्सीग होम जवळ, महाराणी लक्ष्मीबाई गार्डनच्या समोर येथिल श्री. विकास कळमकर यांच्या घराच्या आवारात सदरची झाडे उंच वाढलेली असून सदरच्या झाडांची मुळे जमिनीबाहेर आलेली आहे. तसेच सदरच्या झाडांची उंची पाहता सदरची झाडे काढुन पुर्नःरोपण करणे शक्य नाही. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

(कांचन गायकवाड)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner